24 MAR 2026

लोकमत

# एमबीए प्रवेशासाठी ३० मार्चपर्यंत मुदत


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या ऑनलाइन एमबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रिया सुरू असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३० मार्च २०२६ आहे, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यताप्राप्त हा अभ्यासक्रम पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने (प्रवेश ते निकाल) राबविण्यात येणार असून, पदवी इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या समकक्ष आहे. प्रवेश अर्ज भरण्यासाठी इच्छुकांनी संकेतस्थळाला भेट द्यावी आणि मुदतीपूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

जनप्रवास

# विद्यापीठात ३० मार्चपर्यंत ऑनलाईन एम. बी. ए. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व ए.आय.सी.टी.ई.मान्यता प्राप्त ऑनलाइन एम.बी.ए.अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी-फेब्रुवारी २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु असून इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने ३० मार्च पर्यंत सादर करावेत, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.



विद्यापीठ अनुदान आयोगच्या वतीने ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरु आहे. हा अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत असणारी सर्व शैक्षणिक प्रक्रिया ही ऑनलाइन स्वरुपाची असणार आहे. ही पदवी ही इतर कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकष एकचा दर्जा असणारे शिवाजी विद्यापीठ ऑनलाइन अभ्यासक्रम सुरु करून बदलत्या जगातील आव्हानांना विद्यार्थी समर्थपणे समोर जावा याकरिता एक ऐतिहासिक पाऊल टाकत आहे. आता घर बसल्या मोबाईल, संगणकद्वारे जागतिक दर्जाचा ऑनलाइन एम.बी.ए.अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुवर्ण संधी दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र इच्छुकांना देत आहे. सुसज्ज अशा लर्निंग मेनेजमेंट सिस्टीमद्वारे विषय तज्ञांनी विकसित व्हिडीओ लेक्चर्स, इ – बुक्स लाईव्ह कॉन्सालिंगसेशन, डिस्कशन फोरम, प्रक्टिस टेस्ट माध्यमातून संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी आहे. तसेच विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून रोजगाराची संधी मिळणार आहे. इच्छुकांनी प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ यावर करणे आवश्यक आहे.

24 MAR 2026
पुढारी

# एमबीए अभ्यासक्रम प्रवेश अर्ज प्रक्रियेची ३० मार्चपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यताप्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची जानेवारी-फेब्रुवारी सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने ३० मार्चपर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत असणारी सर्व शैक्षणिक प्रक्रिया ही ऑनलाईन असणार आहे. ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची पदवी ही इतर कोणत्याही मान्यताप्रात विद्यापीठाच्या समकक्ष आहे. इच्छुकांनी https:// online.unishivaji.ac.in/admissions/ या लिंकवर जाऊन प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 MAR 2026 तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज रक्तदान शिबिर



- भौतिकशास्त्र विभागात आयोजन
- जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते होणार उद्घाटन
- नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टचा पुढाकार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभाग, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट आणि सीपीआर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २४ रोजी आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन सकाळी १०.१५ वा. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात होणार आहे.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होईल. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन परिषदेचे स्वागत परुळेकर, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या शीतल सोनकवडे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. भूषण मिरज उपस्थित राहणार आहेत.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला, उपचार व संदर्भ सेवा दिली जाईल. यात जनरल मेडिसिन, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, नेत्रतपासणी, दंतचिकित्सा, कान-नाक-घसा आणि हृदयविकार तपासणी केली जाईल. रक्त तपासणी, मूत्र तपासणीची सोय शिबिरात असणार आहे. सहभागींना आवश्यक औषधे विनामूल्य दिली जाणार आहेत. हे शिबिर प्रामुख्याने विद्यापीठातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी आहे. नागरिकही यात सहभागी होऊ शकतात. 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर प्रवेश दिला जाणार आहे. ऑनलाइन नोंदणीची सोय उपलब्ध आहे.

सर्व सहभागींनी सकाळी ९.३० पर्यंत शिबिरस्थळी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक समितीने केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ.एम. व्ही. टाकळे, डॉ. ए. आर. पाटील किंवा डॉ. एम. आर. वाईकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले आहे.

जनप्रवास

# विद्यापीठात आज आरोग्य तपासणी

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग, छत्रपती प्रमिलाराजे (सीपीआर) रुग्णालय आणि नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट (कोल्हापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी २४ मार्च रोजी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

जिल्हाधिकारी येडगे यांच्या हस्ते विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात मंगळवारी सकाळी शिबिराचे उद्घाटन होईल. यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या शीतल सोनकवडे, सीपीआरचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, डॉ. भूषण मिरजे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी अंतर्गत जनरल मेडिसिन, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, नेत्रतपासणी, दंतचिकित्सा, कान-नाक-घसा आणि हृदयविकार तपासणीबाबत मोफत सल्ला, उपचार व संदर्भ सेवा दिली जाईल. पूर्ण रक्त तपासणी आणि लघवी तपासणीची सोय उपलब्ध असेल. गरजू सहभागींना आवश्यक औषधे विनामूल्य दिली जातील. शिबिर विद्यापीठातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी असले तरी मर्यादित संख्येत नागरिकही यात सहभागी होऊ शकतात. 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी गुगल फॉर्म लिंकवर नोंदणी करावी. सर्व सहभागींनी सकाळी ९:३० वाजेपर्यंत शिबीरस्थळी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. सोनकवडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. एम. व्ही. टाकळे (८४५९४८३४३३), डॉ. ए. आर. पाटील (९६३७५१६०८७) आणि डॉ. एम. आर. वाईकर (९८६०८६१७५८) यांच्याशी संपर्क साधावा.

2 4 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र अधिविभाग, छत्रपती प्रमिलाराजे (सीपीआर) रुग्णालय व नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २४) आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.१५ वाजता विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होईल. याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या शीतल सोनकवडे, सीपीआर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, डॉ. भूषण मिरजे आदी उपस्थित राहणार आहेत. शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. सोनकवडे यांनी केले आहे.

2 4 MAR 2026


सकाळ

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिकारकांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या थोर क्रांतिकारकांच्या कार्याला आणि स्मृतींना आज अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते क्रांतिकारकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांच्या बलिदानाचा वारसा स्मरणात ठेवण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. वैशाली सावंत, डॉ. इराण्णा उडचन, डॉ. प्रवीण प्रभू, डॉ. रश्मी देशमुख, डॉ. रुपाली दाभाडे, डॉ. उदय पाटील, प्रशांत पाटील, हेमंत तिरमारे, हृदयनाथ खंडागळे, गणेश शिंदे उपस्थित होते.

24 MAR 2026

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त थोर क्रांतिकारकांच्या कार्याला व स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त क्रांतिकारकांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या थोर क्रांतिकारकांच्या कार्याला व स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते क्रांतिकारकांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर उपस्थित होते.

2 4 MAR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजकारणात दिव्यांगांना स्थान नाही, हीच मोठी शोकांतिका

## यूजीसीचे सहसचिव मनोज कुमार : शिवाजी विद्यापीठात दिव्यांग व्यक्तींसंदर्भात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत तसेच राजकीय सहभागात पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अपंगत्वाच्या आधारावर त्यांच्या बाबतीत कोणताही भेदभाव होऊ नये, राजकारणात दिव्यांगांना स्थान नाही, हीच मोठी शोकांतिका अशी खंत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सहसचिव डॉ. मनोज कुमार यांनी सोमवारी व्यक्त केली.

राजर्षी शाहू सभागृहात 'उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांसाठी सुलभता मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके' या विषयावर शिवाजी विद्यापीठ येथील कार्यशाळेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यशाळेस प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथील सेंटर फॉर डिसॅबिलिटीज् स्टडीज अँड सोशल वर्कच्या अध्यक्षा डॉ. संध्या लिमये यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी घालून उद्घाटन करण्यात आले.

### शैक्षणिक संस्थांमध्ये हवेत रॅम्प, लिफ्ट

दिव्यांग महिलांना दुहेरी अडचणींना सामोरे जावे लागते, याकडे लक्ष वेधत डॉ. मनोजकुमार यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये रॅम्प, लिफ्ट, रेलिंग, सुलभ शौचालये, ब्रेल लिपीतील फलक आणि अडथळामुक्त पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली.

डॉ. मनोज कुमार म्हणाले, देशातील सुमारे सात टक्के दिव्यांग लोकसंख्येचा आवाज संसदेत आणि राजकीय क्षेत्रात पोहोचत नसल्यामुळे त्यांच्यासाठी स्वतंत्र आयोगाची आवश्यकता आहे. दिव्यांग व्यक्तींना समान संधी मिळण्यासाठी विद्यमान तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. केवळ सहानुभूती न दाखवता त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होईल, असे प्रयत्न समाजाने करणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगाराच्या क्षेत्रात दिव्यांगांसाठी अधिक संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची गरज आहे. मतदान कक्ष, वाहतूक सुविधा आणि आरक्षणामध्ये दिव्यांगांसाठी सुलभता निर्माण करण्यासाठी न्याय व्यवस्थेने संवेदनशीलतेने काम केले आहे.

डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. सध्या विद्यापीठात ४६ दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संलग्न महाविद्यालयांमध्ये २०० दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दिव्यांग व्यक्तींसाठी यूजीसी योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. यावेळी टाटा सामाजिक विज्ञान संस्था येथील सहायक प्राध्यापक डॉ. मधुरा नागचौधरी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 MAR 2026
महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimbi Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक: 'युजीसी'चे सहसचिव डॉ. मनोज कुमार

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज):

दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत आणि राजकीय सहभागात पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. अपंगत्वाच्या आधारावर त्यांच्या बाबतीत भेदभाव केला जाऊ नये, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) सहसचिव डॉ.मनोज कुमार यांनी केले.

दिव्यांग व्यक्तींसाठीची युजीसी- योजना आणि शिवाजी विद्यापीठाचे सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च शिक्षणसंस्था आणि विद्यापीठासाठी सुलभता मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके या विषयावर राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. सेंटर फॉर डिसेबिलिटीज् स्टडीज अँड सोशल वर्क, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील अध्यक्षा डॉ.संध्या लिमये यांची कार्यशाळेला विशेष उपस्थिती होती.



डॉ. मनोज कुमार म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना समान संधी उपलब्ध होण्यासाठी सर्व तरतुदींची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अपंगत्वाबाबत कोरडी सहानुभूती न दाखविता त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यासाठी समाजाने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. दिव्यांगांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत. मतदान कक्ष, वाहतूक आणि आरक्षणांमध्ये दिव्यांगांना लाभ होण्यासाठी न्यायपालिकेने अत्यंत संवेदनशीलतेने कार्यवाही केली आहे. मागील तीस वर्षांमध्ये शासनाने विविध माध्यमातून अनेक योजना राबविलेल्या आहेत. आवाजहीन अशा दिव्यांग बांधवांना समाजात ताठ मानेने जगण्यासाठी सहाय्य करावे. लोकसंख्येच्या सात टक्के असलेल्या दिव्यांगांचा आवाज संसदेमध्ये आणि राजकीय परीघामध्ये पोहचू शकत नाही. त्यांच्याकरिता स्वतंत्र आयोग असणे आवश्यक आहे. विकसित भारताकडे जात असताना सात टक्के दिव्यांग समाजाने मागे राहणे संयुक्तिक नाही. दिव्यांगांना प्रवासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. दिव्यांग महिलांना दुहेरी त्रासाचा सामना करावा लागतो. शाळा-महाविद्यालयांमध्ये रॅम्प, लिफ्ट, रेलिंग, दिव्यांगांसाठी सोयीस्कर शौचालय, ब्रेल लिपीतील फलक, अडथळामुक्त परिसराची पायाभुत सुविधा दिव्यांगांना उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनेक सोयी-सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. साधारणपणे ४६ दिव्यांग विद्यार्थी विद्यापीठातील विविध अधिविभागांत शिकत आहेत. दोनशे दिव्यांग विद्यार्थी संलग्नित महाविद्यालयांत शिकत आहेत. सर्वसमावेशक शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. दिव्यांग व्यक्तींसाठी युजीसी योजनेच्या समन्वयक डॉ.प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी टाटा सामाजिक विज्ञान संस्था येथील सहा.प्राध्यापक डॉ. मधुरा नागचौधरी यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विविध संस्थांचे दिव्यांग विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

2 4 MAR 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात शहीद दिनी क्रांतिकारकांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त सोमवारी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव या थोर क्रांतिकारकांच्या कार्याला आणि स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते क्रांतिकारकांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या बलिदानाचा वारसा स्मरणात ठेवण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. वैशाली सावंत, डॉ. इराण्णा उडचन, डॉ. प्रवीण प्रभू, डॉ. रश्मी देशमुख, डॉ. रुपाली दाभाडे, डॉ. उदय पाटील, प्रशांत पाटील, हेमंत तिरमारे, हृदयनाथ खंडागळे, गणेश शिंदे, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

2 4 MAR 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना निर्णय प्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक

## 'यूजीसी'चे सहसचिव डॉ. मनोज कुमार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिव्यांगांना निर्णय प्रक्रियेत आणि राजकीय सहभागात पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. अपंगत्वाच्या आधारावर त्यांच्या बाबतीत भेदभाव केला जाऊ नये, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सहसचिव डॉ. मनोज कुमार यांनी केले. दिव्यांग व्यक्तींसाठीची यूजीसी- योजना आणि शिवाजी विद्यापीठाचे सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठासाठी सुलभता मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके' या विषयावर राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. सेंटर फॉर डिसेबिलिटीज स्टडीज अँड सोशल वर्क, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील अध्यक्षा डॉ. संध्या लिमये यांची कार्यशाळेला विशेष उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना यूजीसीचे सहसचिव डॉ. मनोज कुमार.**

डॉ. मनोज कुमार म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना समान संधी उपलब्ध होण्यासाठी सर्व तरतुदींची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अपंगत्वाबाबत कोरडी सहानुभूती न दाखवता त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. दिव्यांगांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत. मागील तीस वर्षांमध्ये शासनाने विविध माध्यमांतून अनेक योजना राबवलेल्या आहेत. आवाजहीन अशा दिव्यांग बांधवांना समाजात ताठ मानेने जगण्यासाठी साहाय्य करावे. लोकसंख्येच्या सात टक्के असलेल्या दिव्यांगांचा आवाज संसदेमध्ये आणि राजकीय परिघामध्ये पोहोचू शकत नाही. त्यांच्यासाठी स्वतंत्र आयोग असणे आवश्यक आहे. विकसित भारताकडे जात असताना सात टक्के दिव्यांग समाजाने मागे राहणे संयुक्तिक नाही. दिव्यांगांना प्रवासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. दिव्यांग महिलांना दुहेरी त्रासाचा सामना करावा लागतो. शाळा-महाविद्यालयांमध्ये रँम, लिफ्ट, रेलिंग, दिव्यांगासाठी सोयीस्कर शौचालय, ब्रेल लिपीतील फलक, अडथळामुक्त परिसराची पायाभूत सुविधा दिव्यांगांना उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनेक सोयी-सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. साधारणपणे ४६ दिव्यांग विद्यार्थी विद्यापीठातील विविध अधिविभागांत शिकत आहेत. दोनशे दिव्यांग विद्यार्थी संलग्नित महाविद्यालयांत शिकत आहेत. सर्वसमावेशक शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी यूजीसी योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी टाटा सामाजिक विज्ञान संस्था येथील सहायक प्राध्यापक डॉ. मधुरा नागचौधरी आदी उपस्थित होते.

2 4 MAR 2026
पुढारी

# दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक

## 'यूजीसी'चे सहसचिव डॉ. मनोज कुमार यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत व राजकीय सहभागात पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. अपंगत्वाच्या आधारावर त्यांच्या बाबतीत भेदभाव केला जाऊ नये, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) सहसचिव डॉ. मनोज कुमार यांनी केले.

दिव्यांग व्यक्तींसाठीची युजीसी-योजना व शिवाजी विद्यापीठाचे सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठासाठी सुलभता मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. सेंटर फॉर डिसॅबिलिटीज स्टडीज अँड सोशल वर्क, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील अध्यक्षा डॉ. संध्या लिमये यांची कार्यशाळेला विशेष उपस्थिती होती.डॉ. मनोज कुमार म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना समान संधी उपलब्ध होण्यासाठी सर्व तरतुदींची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अपंगत्वाबाबत कोरडी सहानुभूती न दाखविता त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यासाठी समाजाने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, साधारणपणे ४६ दिव्यांग विद्यार्थी विद्यापीठातील विविध अधिविभागांत शिकत आहेत. दोनशे दिव्यांग विद्यार्थी संलग्नित महाविद्यालयांत शिकत आहेत. सर्वसमावेशक शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी यूजीसी योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. यावेळी टाटा सामाजिक विज्ञान संस्था येथील सहा. प्राध्यापक डॉ. मधुरा नागचौधरी यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख, शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2026

मंगळवार दि.२४-०३-२०२६
वार्ता शक्ति

# अनेक अडथळ्यांवर मात करीत 'जीएसटी' करप्रणाली देशात यशस्वी: सुरेंद्र माणकोस्कर





कोल्हापूर, दि. २३ (प्रतिनिधी) : विविध करप्रणालींच्या गुंतागुंतीतून मार्ग काढत 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे मोठे आव्हानात्मक होते. तथापि, वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली अनेक अडथळ्यांवर मात करून देशात यशस्वीपणे स्थिरावल्याचे मत बडोदा येथील वस्तू व सेवा कर आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहकार्याने आयोजित 'जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन अँड ईझ ऑफ डुईंग बिझिनेस: विकसित भारत@२०४७कडे मार्गक्रमण' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. कलबुर्गी येथील कर्नाटक केंद्रीय विद्यापीठातील विषयतज्ज्ञ डॉ. पांडुरंग पी. हे बीजभाषक म्हणून तर विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी या प्रमुख उपस्थित होत्या.

सुरेंद्र माणकोस्कर म्हणाले, पूर्वी केंद्र व राज्य सरकारांच्या वेगवेगळ्या करांमुळे उद्योगांवर मोठा करभार होता. मनोरंजन कर, उत्पादन शुल्क, विक्रीकर, ऑक्ट्रॉय यांसारख्या अनेक करांचा एकत्रित परिणाम ७० ते ८० टक्क्यांपर्यंत जात असे. या पार्श्वभूमीवर जीएसटीमुळे एकसंध आणि सुलभ करप्रणाली निर्माण होऊन उद्योगांना दिलासा मिळाला. जीएसटी लागू करताना कर दरांचे एकीकरण, वस्तू व सेवांचे वर्गीकरण, कर संकलनाची पद्धत यांसारखी अनेक तांत्रिक आव्हाने होती. विविध राज्यांमध्ये कर महसूल वाटप, वस्तूंच्या पुरवठ्याचे मूल्य ठरवणे, तसेच 'रोटी, कपडा आणि मकान' या मूलभूत गरजांवर एकसमान कर लागू करणे ही मोठी कसरत होती. मात्र या सर्व अडथळ्यांवर मात करत जीएसटी प्रणाली कार्यान्वित करण्यात यश आले.

उद्योग क्षेत्रासाठी जीएसटीने मोठी क्रांती घडवली असल्याचे सांगताना माणकोस्कर म्हणाले, व्यवसाय नोंदणी प्रक्रिया करण्यास पूर्वी ४० दिवस लागत. ती आता अवघ्या ३ ते ४ दिवसांत पूर्ण होत आहे. ऑनलाईन आणि 'फेसलेस' प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली असून, देशभरातून व्यवसाय करणे सुलभ झाले आहे. एका ठिकाणाहून संपूर्ण देशात व्यवसायाचे संचालन शक्य झाले आहे. जीएसटीमुळे उद्योगांचा विस्तार वेगाने होत असून पूर्वी मर्यादित क्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगांनी आता देशभर आपला विस्तार सुरू केला आहे. मोठ्या लोकसंख्येच्या बाजारपेठेत प्रवेश मिळवणे सुलभ झाल्याने उद्योगांना नवी संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, जीएसटी प्रणाली अजूनही विकसित होत असून, त्यात सुधारणा करण्याची गरज कायम आहे. करचुकवेगिरी, बनावट बिले यांसारख्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तांत्रिक उपाययोजना सुरू आहेत. तसेच करप्रणाली अधिक सोपी, पारदर्शक आणि उद्योगस्नेही करण्यासाठी आगामी काळात आणखी महत्त्वपूर्ण सुधारणा विचाराधीन असल्याचेही माणकोस्कर यांनी सांगितले.

आज जीएसटी अंतर्गत ५%, १२% आणि २८% असे तीन प्रमुख कर दर निश्चित करण्यात आले असून, सोन्या-चांदीसाठी ३% विशेष दर आहे. कर दरांची संख्या कमी करून प्रणाली अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भविष्यात ही रचना आणखी सोपी करून दोन करदरांच्या दिशेने वाटचाल होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

जीएसटी हा अप्रत्यक्ष करप्रणालीतील महत्त्वाचा टप्पा असून त्यामुळे 'ईझ ऑफ डुईंग बिझिनेस'ला मोठी चालना मिळाली असल्याचे आपल्या बीजभाषणात सांगताना डॉ. पांडुरंग पी. म्हणाले, वस्तू व सेवा कर (जीएसटी) ही भारताच्या अप्रत्यक्ष करप्रणालीतील ऐतिहासिक आणि महत्त्वाची सुधारणा असून, देशाच्या आर्थिक प्रगतीत तिची निर्णायक भूमिका आहे. जीएसटीची अंमलबजावणी १ जुलै २०१७ रोजी करण्यात आली असून, ती अप्रत्यक्ष करप्रणालीतील 'माईलस्टोन' ठरली आहे. विविध करांचे एकत्रीकरण करून एकसंध कररचना निर्माण करण्यात जीएसटीला यश मिळाले आहे. देशातील पूर्वीची गुंतागुंतीची करप्रणाली—उत्पादन शुल्क, विक्रीकर, सेवा कर यांना एकत्र करून सुलभ प्रणाली तयार करण्यात आली आहे.

डॉ. पांडुरंग म्हणाले, जीएसटी ही 'कंझम्प्शन बेस्ड' (उपभोगाधारित) करप्रणाली आहे. म्हणजेच ज्या राज्यात वस्तू किंवा सेवांचा वापर होतो, त्या राज्याला कर महसूल मिळतो. त्यामुळे करप्रणाली अधिक न्याय्य आणि पारदर्शक झाली आहे. पूर्वी अस्तित्वात असलेल्या 'ओरिजिन बेस्ड' करप्रणालीत अनेक विसंगती होत्या. त्या दूर करण्यात जीएसटीने महत्त्वाची भूमिका बजावली. भारताच्या संघराज्य रचनेनुसार 'ड्युअल जीएसटी मॉडेल' स्वीकारण्यात आले असून, केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये कर महसुलाचे योग्य विभाजन करण्यात आले आहे. यामध्ये सीजीएसटी, एसजीएसटी आणि आयजीएसटी यांसारख्या करघटकांमुळे आंतरराज्यीय व्यवहार अधिक सुलभ झाले आहेत. यामुळे देशभर एकसमान बाजारपेठ निर्माण झाली आहे. 'ईझ ऑफ डुईंग बिझिनेस'च्या दृष्टीने जीएसटी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. कर भरणा, रिटर्न फायलिंग, इनपुट टॅक्स क्रेडिट यांसारख्या प्रक्रिया डिजिटल आणि सुलभ झाल्याने उद्योगांना मोठा दिलासा मिळाला आहे. व्यवसाय सुरू करणे आणि विस्तार करणे अधिक सोपे झाले आहे. अलीकडेच 'जीएसटी २.०' अंतर्गत काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या असून, करदरांचे सुलभीकरण, इनपुट टॅक्स क्रेडिट प्रणालीतील बदल आणि प्रक्रियांचे आधुनिकीकरण यावर भर देण्यात आला आहे. यामुळे करप्रणाली अधिक कार्यक्षम आणि उद्योगस्नेही होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी म्हणाल्या, माहिती तंत्रज्ञान आणि डिजिटल क्रांतीने नागरिकांचे जीवन आणि राहणीमान सुलभ केले. त्याचप्रमाणे जीएसटीने भारताच्या करप्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणत उद्योगपती, पारदर्शकता आणि सुलभता यांना चालना दिली आहे. तंत्रज्ञानाधिष्ठित, प्रवाही, प्रभावी आणि पारदर्शक करसंरचनेचा हा नमुना असून देशाच्या भविष्यातील आर्थिक विकासासाठी मजबूत पाया प्रदान करण्याचे काम करीत आहे.

जीएसटी केवळ करप्रणाली नाही, तर देशाच्या आर्थिक परिवर्तनाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगून अध्यक्षीय मनोगतात डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, जीएसटीमुळे देशातील करप्रणालीत आमूलाग्र बदल झाला असून, डिजिटलायझेशन आणि सुलभ प्रक्रियांमुळे उद्योग व व्यवसाय क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. 'ईझ ऑफ डुईंग बिझिनेस'च्या दृष्टीने जीएसटी महत्त्वपूर्ण ठरत असून, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यात तिचा मोठा वाटा आहे. जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन आणि विकसित भारत २०४७ या संकल्पनांच्या अनुषंगाने अशा प्रकारचे शैक्षणिक उपक्रम महत्त्वाचे ठरत असून, विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षक यांना नव्या कल्पना व दिशादर्शन मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या राष्ट्रीय चर्चासत्रात डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. स्मिता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. चर्चासत्रासाठी देशभरातील सुमारे १२५ संशोधकांनी नोंदणी केली असून दोन दिवसांत एकूण ४६ शोधनिबंध सादर केले जाणार आहेत.

दरम्यान, उद्घाटन सत्रानंतर दिवसभरात झालेल्या विविध सत्रांमध्ये मान्यवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. 'जीएसटी सुधारणा' या सत्रात सीए गिरीष कुलकर्णी, डॉ. वर्षा मैंदर्गी आणि डॉ. नितीन माळी यांनी सहभाग घेतला. 'जीएसटी गव्हर्नन्स व डिजिटलायझेशन' या विषयावरील सत्रात छत्रपती संभाजीनगरचे सीए उमेश शर्मा, प्राचार्य डॉ. एन.एल. कदम आणि अविनाश भाले यांनी सहभाग घेतला.

अखेरच्या सत्रात डॉ. केदार मारुलकर यांच्या अध्यक्षतेखाली शोधनिबंध सादरीकरणाचे सत्र झाले.

जनसंपर्क कक्ष
24 MAR 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनेक अडथळ्यांवर मात करत 'जीएसटी' करप्रणाली यशस्वी

## शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास प्रारंभ

▮ सुरेंद्र माणकोस्कर ▮



▮ कोल्हापूर : प्रतिनिधी

विविध करप्रणालींच्या गुंतागुंतीतून मार्ग काढत 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे मोठे आव्हानात्मक होते. तथापि, वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली अनेक अडथळ्यांवर मात करत देशात यशस्वीपणे स्थिरावल्याचे मत बडोदा येथील वस्तू व सेवा कर आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहकार्याने आयोजित 'जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन अँड ईझ ऑफ डुईंग बिझिनेस : विकसित भारत @२०४७ कडे मार्गक्रमण' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ऑनलाइन उपस्थित राहून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. कलबुर्गी येथील कर्नाटक केंद्रीय विद्यापीठातील विषयतज्ज्ञ डॉ. पांडुरंगा व्ही. हे बीजभाषक म्हणून, तर विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी या प्रमुख उपस्थित होत्या.

सुरेंद्र माणकोस्कर, डॉ. पांडुरंगा म्हणाले, अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी यांनीही मनोगत व्यक्त केले.

जीएसटी केवळ करप्रणाली नव्हे, तर देशाच्या आर्थिक जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगून अध्यक्षीय मनोगतात डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, जीएसटीमुळे देशातील करप्रणालीत आमूलाग्र बदल झाला असून, डिजिटलायझेशन आणि सुलभ प्रक्रियांमुळे उद्योग व व्यवसाय क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. स्मिता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. 'जीएसटी सुधारणा' या सत्रात सीए गिरीश कुलकर्णी, डॉ. वर्षा मैंदर्गी आणि डॉ. नितीन माळी यांनी सहभाग घेतला. 'जीएसटी गव्हर्नन्सचे डिजिटलायझेशन' या विषयावरील सत्रात छत्रपती संभाजीनगरचे सीए उमेश शर्मा, प्राचार्य डॉ. एन. एल. कदम आणि अविनाश भाले यांनी सहभाग घेतला. अखेरच्या सत्रात डॉ. केदार मारुलकर यांच्या अध्यक्षतेखाली शोधनिबंध सादरीकरणाचे सत्र झाले.

24 MAR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज ॲन्ड व्ह्यूज

वामाक्षी

# अनेक अडथळ्यांवर मात करीत 'जीएसटी' करप्रणालीची देशात यशस्वी वाटचाल : डॉ. सुरेंद्र माणकोस्कर

## शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास प्रारंभ

कोल्हापूर, (महान्यूज ॲन्ड व्ह्यूज):



[illegible]

24 MAR 2026


सकाळ,

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योग क्षेत्रासाठी 'जीएसटी'ने मोठी क्रांती घडवली

## सुरेंद्र माणकोस्कर : विद्यापीठात वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २३ : उद्योग क्षेत्रासाठी वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणालीने मोठी क्रांती घडवली आहे, असे मत बडोदा येथील वस्तू व सेवा कर आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर यांनी आज येथे व्यक्त केले. विविध करप्रणालींच्या गुंतागुंतीतून मार्ग काढत 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे मोठे आव्हानात्मक होते. मात्र, जीएसटी प्रणाली अनेक अडथळ्यांवर मात करत देशात यशस्वीपणे स्थिरावली आहे, असेही ते म्हणाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ऑनलाईन मार्गदर्शन करताना बडोदा येथील वस्तू व सेवा कर आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहकार्याने सुरू झालेल्या 'जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन अँड ईझ ऑफ डुईंग बिझिनेस : विकसित भारत@२०४७ कडे मार्गक्रमण' राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते ऑनलाईन बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.

माणकोस्कर म्हणाले, 'पूर्वी केंद्र व राज्य सरकारच्या वेगवेगळ्या करांमुळे उद्योगांवर मोठा करभार होता. मनोरंजन कर, उत्पादन शुल्क, विक्री कर, ऑक्ट्रॉय यांसारख्या अनेक करांचा एकत्रित परिणाम ७० ते ८० टक्क्यांपर्यंत जात असे. जीएसटीमुळे एकसंध व सुलभ करप्रणाली निर्माण होऊन उद्योगांना दिलासा मिळाला आहे.

जीएसटी लागू करताना कर दरांचे एकीकरण, वस्तू व सेवांचे वर्गीकरण, कर संकलनाची पद्धत यांसारखी अनेक तांत्रिक आव्हाने होती. व्यवसाय नोंदणी प्रक्रिया करण्यास पूर्वी ४० दिवस लागत. ती आता अवघ्या ३ ते ४ दिवसांत पूर्ण होत आहे. जीएसटीमुळे उद्योगांचा विस्तार वेगाने होत असून, पूर्वी मर्यादित क्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगांनी आता देशभर शाखा विस्तार सुरू केला आहे. मोठ्या लोकसंख्येच्या बाजारपेठेत प्रवेश मिळवणे सुलभ झाल्याने उद्योगांना नवी संधी उपलब्ध झाली आहे.'

कलबुर्गी येथील कर्नाटक केंद्रीय विद्यापीठातील विषयतज्ज्ञ डॉ. पांडुरंग व्ही. म्हणाले, 'जीएसटी ही भारताच्या अप्रत्यक्ष करप्रणालीतील ऐतिहासिक आणि महत्त्वाची सुधारणा असून, देशाच्या आर्थिक प्रगतीत तिची निर्णायक भूमिका आहे. विविध करांचे एकत्रीकरण करून एकसंध कररचना निर्माण करण्यात जीएसटीने यश मिळवले आहे.' वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी माहिती तंत्रज्ञान आणि डिजिटल क्रांतीने नागरिकांचे जीवन आणि राहणीमान सुलभ केल्याचे सांगितले. गिरीश कुलकर्णी, डॉ. नितीन माळी, उमेश शर्मा, प्राचार्य डॉ. एन. एल. कदम, अभिलाषा भाले यांनी मार्गदर्शन केले. अखेरच्या सत्रात डॉ. केदार मारुलकर यांच्या अध्यक्षतेखाली शोधनिबंध सादरीकरण झाले. डॉ. स्मिता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

24 MAR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत सहभाग मिळावा

## डॉ. मनोज कुमार : विद्यापीठात सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्रात कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : दिव्यांगांना अपंगत्वाबाबत कोरडी सहानुभूती न दाखविता त्यांना आत्मविश्वास वाढवण्यासाठी समाजाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सहसचिव डॉ. मनोज कुमार यांनी येथे केले. दिव्यांगांना निर्णयप्रक्रियेत व राजकीय सहभागात पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

दिव्यांग व्यक्तींसाठीची यूजीसी-योजना आणि शिवाजी विद्यापीठाच्या सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या 'उच्च शिक्षणसंस्था आणि विद्यापीठासाठी सुलभता मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके' विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा झाली. सेंटर फॉर डिसॅबिलिटीज् स्टडीज अँड सोशल वर्क, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील अध्यक्षा डॉ. संध्या लिमये यांची कार्यशाळेला विशेष उपस्थिती होती.

डॉ. कुमार म्हणाले, 'दिव्यांग व्यक्तींना समान संधी उपलब्ध होण्यासाठी सर्वतरतुदींची अंमलबजावणी आवश्यक आहे. दिव्यांगांना शिक्षण, आरोग्य सेवा, रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत. मतदान कक्ष, वाहतूक आणि



कोल्हापूर : दिव्यांग व्यक्तींसाठीची यूजीसी- योजना आणि शिवाजी विद्यापीठाच्या सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्रातर्फे झालेल्या कार्यशाळेत बोलताना 'यूजीसी'चे सहसचिव डॉ. मनोज कुमार.

आरक्षणात दिव्यांगांना लाभ होण्यासाठी न्यायपालिकेने संवेदनशीलतेने कार्यवाही केली आहे. ३० वर्षांत शासनाने विविध माध्यमातून अनेक योजना राबविल्या आहेत. आवाजहीन दिव्यांग व्यक्तींना समाजात ताठ मानेने जगण्यासाठी साह्य करावे.' टाटा सामाजिक विज्ञान संस्था येथील प्रा. डॉ. मधुरा नागचौधरी उपस्थित होत्या. समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले.

### दिव्यांगांसाठी स्वतंत्र आयोग आवश्यक

■ डॉ. कुमार म्हणाले, 'लोकसंख्येच्या सात टक्के असलेल्या दिव्यांगांचा आवाज संसदेत व राजकीय परिघात पोहोचू शकत नाही. त्यांच्यासाठी स्वतंत्र आयोग आवश्यक आहे. विकसित भारताकडे जात असताना सात टक्के दिव्यांग समाजाने मागे राहणे संयुक्तिक नाही. दिव्यांगांना प्रवासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. दिव्यांग महिलांना दुहेरी त्रासाचा सामना करावा लागतो.' शाळा-महाविद्यालयांत रॅम्प, लिफ्ट, रेलिंग, दिव्यांगांसाठी सोयीस्कर शौचालय, ब्रेल लिपीतील फलक, अडथळामुक्त परिसराची पायाभूत सुविधा दिव्यांगांना उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.'